## नि. २७ वरील आदेश

वि.प. यांनी प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ९१ प्रमाणे दाखल करुन अर्जदार यांचेकडुन कागदपत्रे मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

२. अर्जदार यांचे म्हणण्याप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज वि.प. यांनी कलम ९१ प्रमाणे दाखल केलेला असुन अर्जदार यांचे पगारपत्रक, तीन वर्षांचे बँक स्टेटमेंट, भाडे करारपत्र, इत्यादी कागदपत्रे अभिलेखावर दाखल होवुन मिळण्याकरीता विनंती केलेली आहे. सदरचा अर्ज दाखल करताना वि.प. यांचे कथनाप्रमाणे सदरची कागदपत्रे ही मा. नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे रजनिश विरुध्द नेहा या न्यायनिर्णयामधील निष्कर्षाप्रमाणे अत्यावश्यक कागदपत्रे आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करावा अशी विनंती वि.प.तर्फे विद्वान विधीज्ञ यांनी केली.

३. सदर अर्जावर अर्जदार यांनी म्हणणे दाखल करुन सदर अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. अर्जदार यांचे कथनाप्रमाणे अर्जदार या कुठेही नोकरीस नाहीत. तसेच त्यांचे नावे बँकेमध्ये कुठेही खाते नाही. त्यामुळे वि.प. यांनी मागणी केलेली कागदपत्रे अर्जदार प्रस्तुतकामी सादर करु शकत नाही. अर्जदार यांनी घर भाडयातील आपसातील करारनामा न्यायालयात दाखल केलेला आहे. व ते करारपत्र दाखल करुन घेण्याची विनंती त्यांनी केलेली आहे.

४. अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वि.प. व अर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वि.प. यांनी नि. ३३ वर प्रस्तुतचे अर्जाचे कामी त्यांचा लेखी युक्तिवाद सादर केलेला आहे. सदर युक्तिवादातील कथनाप्रमाणे अर्जदार यांनी मा. नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे रजनिश विरुध्द नेहा या न्यायनिर्णयात नमुद केल्याप्रमाणे त्यांचा खातेउतारा दाखल केलेला नाही. अर्जदार या वि.प. यांचे सोबत लग्न होण्यापुर्वी दौंड येथील एम.आय.डी.सी. येथे काम करत होत्या व त्यांना चांगला पगार देखील मिळत होता. त्या काम करत होत्या त्या कंपनीतील नियमाप्रमाणे पगार वर्ग करण्याकरीता बँक खाते असणे अत्यावश्यक होते. परंतू, त्यांनी त्यांचे बँक स्टेटमेंट हजर केलेले नाही. तसेच अर्जदार यांनी दि. ०२/०१/२०२४ रोजी खोटा व बनावट भाडे करारपत्र केलेले आहे. सदरचे भाडे करारपत्र हे नोंदणीकृत नसुन नोंदणी कायदयातील तरतुदींचे विरुध्द आहे. सदर भाडे करारपत्र हे सदर दिवशी नोटरी यांचे समक्ष नोंदविण्यात आले असुन सदर करारपत्र हा दि. ०१/०४/२०२३ ते दि. २९/०२/२०२४ या कालावधीसाठी केलेले आहे. सदरचा करारपत्र हा पुर्वीच दाखल करणे गरजेचे होते परंतू, वि.प. यांनी कलम ९१ प्रमाणे दिलेल्या अर्जानंतर सदरचे करारपत्र अर्जदार यांनी दाखल केलेले आहे. त्यामुळे निव्वळ प्रस्तुतकामी त्यांचे हक्कात न्यायनिर्णय मिळविण्याकरीता नोंदणी कायदयातील तरतुदींविरुध्द करारपत्र

तयार करुन तो दाखल केलेला आहे. त्यामुळे अर्जदार यांचे विरुध्द कडक कायदेशीर कारवाई होवुन अर्जदार यांचा अंतरिम पोटगीचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती वि.प. यांनी केलेली आहे.

५. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली असता अर्जदार यांनी नि. ११ वर व वि.प. यांनी नि. १७ वर त्यांचे मा. नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे रजनिश विरुध्द नेहा या न्यायनिर्णयात निष्कर्षित केल्याप्रमाणे उत्पन्न व खर्चाचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. नि. ११ वरील अर्जदार यांचे प्रतिज्ञापत्र पाहता त्यामध्ये त्यांनी शपथेवर असे कथन केले आहे की, त्या कुठेही नोकरीस नाहीत व त्यांचे बँकेत खाते नाही. तसेच वि.प. यांचे अर्जावर म्हणणे देताना देखील अर्जदार तर्फे विद्वान विधीज्ञ यांनी अर्जदार यांचे कोणत्याही बँकेत खाते नसुन त्या कुठेही नोकरीस नाहीत असे कथन केलेले आहे. तसेच अर्जदार तर्फे विद्वान विधीज्ञ यांनी सदर अर्जावर म्हणणे देताना अर्जदार यांचे भाडे करारपत्र अभिलेखावर दाखल करण्याबाबत कथन करुन नि. ३० सोबत भाडेकरारपत्राची प्रत दाखल केलेली आहे.

६. असे असताना ज्याअर्थी अर्जदार यांनी वि.प. यांचे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करताना त्यांचेकडे वि.प. यांनी मागणी केल्याप्रमाणे बँकेचे खाते उतारे व पगारपत्रक नसल्याचे कथन केलेले आहे. त्याअर्थी वि.प. यांचे प्रस्तुत अर्जावर त्याबाबत आदेश पारित करणे अशक्य होत आहे. तसेच वि.प. यांचे प्रस्तुत अर्जातील कथनांचा विचार करता फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ९१ मधील नमुद तरतुदींप्रमाणे वि.प. यांनी प्रस्तुतचा अर्ज अभिलेखावर दाखल केला नसल्याचे दिसुन येत आहे. कारण सदर कलमांतर्गत कागदपत्रांची मागणी करण्याकरीता समन्स जारी करण्याकरीता अत्यावश्यक कागदपत्रे ही कोणाच्या ताब्यामध्ये आहेत अथवा कोणाच्या ताब्यामध्ये असु शकतात हे नमुद करुन तसे कागदपत्रे घेवुन कोणास हजर राहण्यास आदेशित करायचे आहे इत्यादी बाबतचा मजकुर अर्जामध्ये असणे आवश्यक आहे. त्यामुळे वि.प. यांनी दिलेला प्रस्तुतचा अर्ज हा मोघम स्वरुपाचा असल्याचे स्पष्टपणे दिसुन येत आहे.

७. वि.प. यांनी त्यांचे नि. ३३ वर प्रस्तुत अर्जाचे कामी लेखी युक्तिवाद सादर केला असल्याचे दिसुन येते. त्यातील कथनानुसार अर्जदार यांनी बनावट व नोंदणी कायदयातील तरतुदींविरुध्द भाडेकरारपत्र तयार करुन तो अभिलेखावर दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार यांनी मा. नामदार सर्वोच्च न्यायालय यांचे रजनिश विरुध्द नेहा या न्यायनिर्णयात नमुद केल्याप्रमाणे त्यांचे बँक खात्याचे स्टेटमेंट अभिलेखावर दाखल केलेले नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द कडक कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करुन अर्जदार यांचा अंतरिम पोटगीचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे. परंतू, वि.प. यांनी त्यांचे मुळ अर्जाचे कामी अशी कोणतीही मागणी केलेली नाही. निव्वळ सदरची मागणी ही त्यांनी त्यांचे युक्तिवादादरम्यान केलेली असुन सदरची मागणी ही कायदयाती प्रचलित तरतुदींप्रमाणे नसल्याचे दिसुन येत आहे.

८. यासर्व कारणांचा एकत्रीत विचार करता ज्याअर्थी वि.प. यांनी प्रस्तुतचा अर्ज हा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ९१ मधील नमुद तरतुदींप्रमाणे दिलेला नाही व लेखी युक्तिवादा दरम्यान केलेली मागणी ही देखील कायदयातील प्रचलित तरतुदींप्रमाणे केलेली नाही त्याअर्थी वि.प. यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश पारित.

**आदेश**

वि.प. यांचा नि. २७ वरील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

सही/-

दि. ०१/०४/२०२४
ठिकाण - दौंड

(जी.ए. कुलकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ५,
दौंड, ता. दौंड, जि. पुणे